# स्वस्त घरांसाठी विद्यार्थिनीचे पाऊल

म. टा. प्रतिनिधी

**मुंबई :** स्वच्छता कर्मचारी व कचरा वेचकांसाठी स्वतःचे घर म्हणजे जणू एखादे दिवास्वप्न. या वर्गासाठी परवडणारी घरे कशी असावीत, याविषयी संशोधनासाठी एका १७ वर्षीय मुंबईकर विद्यार्थिनीने पुढाकार घेतला आहे. यासंबंधीचा शोधनिबंध संजना रुणवाल हिने राज्य सरकारकडे सादर केला आहे. त्याचे गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी याबद्दल तिचे कौतुक केले आहे.

संजना रुणवाल हिने २०१६ मध्ये 'क्लीन अप फाउंडेशन' या स्वयंसेवी संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या माध्यमातून शहरातील सफाई कामगार आणि कचरावेचक यांच्यासाठी कल्याणकारी कार्य केले जाते. संजना हिने शहरातील कचरावेचकांचे जीवन सुधारण्यासाठी अनेक उपक्रम सुरू केले आहेत. त्या पार्श्वभूमीवर, संजनाने हा शोधनिबंध तयार केला आहे. या शोधनिबंधात केलेल्या शिफारसी राज्याने अंमलात आणल्या, तर समाजातील या क्षेत्राचा सामाजिक विकास शक्य होणार आहे.

संजना रुणवाल हिच्या या अनुकरणीय पान २ वर

# स्वस्त घरांसाठी विद्यार्थिनीचे पाऊल




(पान १ वरून)

कार्याबद्दल राज्याचे गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी तिला प्रशस्तिपत्र देऊन गौरवले आहे. समाजातील या वर्गाच्या कल्याणासाठी गृहनिर्माण धोरणे तयार करताना संशोधनात सुचवलेल्या उपायांचा विचार केला जाऊ शकेल. डॉ. आव्हाड यांनी संजना हिला भविष्यातील प्रयत्नांसाठी, तसेच समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

'सफाई कामगार आणि कचरावेचक यांचे राहणीमान सुधारणे हा आमचा हेतू आहे. त्यांच्यासाठी निवास ही मोठी समस्या आहे याकडे त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे. या संशोधनामुळे परवडणाऱ्या घरांबाबत उपाय पुढे होईल व घरांच्या मालकीच्या समस्येचे निराकरण होईल. सरकारच्या पाठिंब्याद्वारे नजीकच्या भविष्यात याबाबतचा उपाय प्रत्यक्षात येऊ शकतो,' असा विश्वास संजना रुणवाल हिने व्यक्त केला आहे.